आजचा सुविचार

स्वत:ला कधीही कमी लेखू नका;
तुमच्या आत्मविश्वासाने
अशक्य गोष्टी सुद्धा
शक्य होऊ शकतात.

दैनिक **अक्षराज**

अचूक वेध, अचूक बातमी

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

Email : newsaksharaj2021@gmail.com

खालील (क्यू आर कोड) स्कॅन करा...
आणि अक्षराज मीडियाच्या व्हाट्सअप चॅनल ला फॉलो करा व मिळवा सर्व घडामोडींचे अपडेट्स एकाच वेळी एकाच ठिकाणी...
कृपया इथे स्कॅन करा — Plz Scan Here

वर्ष : ०५ | अंक : १२६, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, शुक्रवार, दि.१९ डिसेंबर २०२५ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056


# माणिकराव कोकाटे भाजपच्या चक्रव्यूहात; तो एक मुद्दा ठरला अडचणीचा

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१८, नाशिक :** खोट्या कागदपत्रांच्या आधारावर मुख्यमंत्री कोट्यातून सदनिका लाटल्याप्रकरणी दोषी ठरलेले राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते आणि राज्याचे क्रीडामंत्री माणिकराव कोकाटे यांच्याकडील सर्व खाती काढून घेण्याचा निर्णय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बुधवारी घेतला. माणिकरावांकडील क्रीडा व युवक कल्याण आणि अल्पसंख्याक विकास व औकाफ या खात्यांच्या कार्यभार उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे सोपवण्यात आला आहे. कोकाटे यांच्या गच्छंतीनंतर आता त्यांच्या भाजपसोबतच्या समीकरणांवर चर्चा होऊ लागली आहे.



ॲड. कोकाटेंना नंदुरबारचे पालकमंत्रिपद मिळाले असले तरी त्यांचा डोळा नाशिकच्या पालकमंत्रिपदावर होता. नाशिकमध्ये राष्ट्रवादीचे सर्वाधिक आमदार असल्यामुळे राष्ट्रवादीचा दावा योग्य होता. मात्र, कोकाटेंना पालकमंत्रिपद मिळाले तर नाशिकवर वर्चस्व ठेवणाऱ्या भाजपच्या एका मंत्र्यासह राष्ट्रवादीतल्या एका गटाची अडचण होणार आहे. त्यामुळे राष्ट्रवादीतूनही भाजपच्या नेत्यांना कोकाटेंविरोधात बळ मिळाले. त्यामुळे मंत्रिपद मिळाल्यापासून स्वपक्षीयांसह नाशिकच्या पालकमंत्रिपदावर डोळा ठेवून असलेल्या भाजपने कोकाटेंना वादाच्या चक्रव्यूहात ओढले. बेफिकीर स्वभावामुळे कोकाटेही अलगद या चक्रव्यूहात अडकल्याने त्यांचे राजकीय भविष्य आता धूसर बनले आहे.

**कोकाटे यांची खाती काढली!**

नाशिक येथील येवलेकर मळा परिसरातील दूध संघानजीकच्या इमारतीत शासनाच्या दहा टक्के योजनेतील सदनिका मिळविण्यासाठी माणिकराव व त्यांचे बंधू विजय कोकाटे यांनी कमी उत्पन्नासंदर्भातील कागदपत्रे सादर केली होती. याप्रकरणी नाशिक जिल्हा न्यायालयाने कोकाटे यांना दोन वर्षांच्या कारावासाची शिक्षा सुनावली होती. सत्र न्यायालयाने मंगळवारी ही शिक्षा कायम ठेवल्याने कोकाटे यांचे मंत्रिपद धोक्यात आले होते. त्यातच बुधवारी त्यांच्याविरोधात जिल्हा न्यायालयाने अटक वॉरंट जारी केले. कोकाटे यांना कोणत्याही क्षणी अटक होणार, अशी अटकळ असताना मंत्रिमंडळ बैठकीत त्याचे पडसाद उमटले.

बैठकीनंतर राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष अजित पवार यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली. त्यानंतर चक्रे फिरून रात्री उशिरा मुख्यमंत्र्यांनी कोकाटे यांच्याकडील सर्व खाती काढून घेतली. मुख्यमंत्र्यांनी माणिकराव कोकाटे यांच्याकडील खात्यांचा कार्यभार अजित पवार यांच्याकडे सोपविण्यात येत असल्याचे पत्र राज्यपाल देवव्रत आचार्य यांच्याकडे पाठविले. राज्यपालांनीही त्यास मंजुरी दिली.

माणिकराव कोकाटे हे मंत्रिमंडळात दाखल झाल्यापासून वादग्रस्त ठरले होते. पावसाळी अधिवेशनात विधान परिषदेत बसले असताना मोबाइलवर रमी खेळत असतानाचा त्यांचा व्हिडीओ व्हायरल झाला होता. हे प्रकरण भोवल्याने ३१ जुलै २०२५ रोजी कोकाटे यांचे कृषिमंत्रिपद काढून घेण्यात आले होते. वादग्रस्त ठरलेले कोकाटे हे राष्ट्रवादी काँग्रेसचे दुसरे मंत्री आहेत. याआधी संतोष देशमुख हत्येप्रकरणी आरोप होत असलेले धनंजय मुंडे यांना एप्रिलमध्ये पदाचा राजीनामा द्यावा लागला होता.

## महाराष्ट्र विद्यालयाने राज्यस्तरावर पटकावले सुवर्णपदक



**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.१८, नागपूर :** नांदेड येथे संपन्न झालेल्या शालेय राज्यस्तरीय रस्सीखेच स्पर्धेत १९ वर्षे वयोगटात ५६० किलो वजन गटात महाराष्ट्र विद्यालयाने प्रथम क्रमांक पटकावून सुवर्णपदक प्राप्त केले. सुरुवातीच्या सामन्यात कोल्हापूर विभागाचा २-० ने पराभव केला,उपांत्य सामन्यात पुणे विभागास २-० ने पराभूत करून अंतिम सामन्यात मुंबई विभागाला सुध्दा २-० ने परास्त करून प्रथम क्रमांक पटकावून सुवर्णपदकावर नागपूर विभागाचे नाव कोरले.

विजयी खेळाडूंचे महाराष्ट्र राज्य शिक्षण संस्थेचे सुनील केदार, सुहासताई केदार, सुधिर केदार व संस्थेचे सर्व पदाधिकारी, विद्यालयाचे मुख्याध्यापक अरुण वडस्कर, उपमुख्याध्यापक चंद्रशेखर लिखार, क्रीडा शिक्षक धर्मेंद्र सुर्यवंशी, धैर्यशील सुटे व सर्व शिक्षक व कर्मचारी वर्गाने अभिनंदन केले.

## गुटखा उत्पादकांवर नवीन वर्षांत मकोका लागणार - मंत्री नरहरी झिरवाळ



**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.१८, मुंबई :** राज्यात गुटखा बंदी असतानाही शाळा परिसर, महाविद्यालय परिसरांसह अनेक ठिकाणी गुटखा आढळून येतो. त्यामुळे गुटखा बंदी कायद्याची कडक अंमलबजावणी करण्यासाठी मकोका लागू करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. या मकोका लावण्यासाठीच्या प्रस्तावात आवश्यक त्या दुरुस्त्या कायद्यात करण्यात येणार आहेत. त्यानंतर येत्या नवीन वर्षांत गुटखा उत्पादकांवर मकोका लागणार असल्याची माहिती अन्न व औषध प्रशासन व विशेष सहाय्य मंत्री नरहरी झिरवाळ यांनी दिली.

यापूर्वी गुटखा उत्पादक व विक्रेत्यांवर मकोका लावण्यासाठीचा प्रस्ताव विधी व न्याय विभागाकडे पाठवण्यात आला होता. मात्र कायद्यातील तरतुदींनुसार हार्म आणि हर्ट या दोन्ही घटकांअभावी तो लागू होत नाही. त्यामुळे या कायद्यात बदल करण्यात येऊन गुटखा व्यवसाय करणाऱ्यांवरही मकोका लागू करता येईल, अशा आवश्यक दुरुस्त्या कायद्यात करण्यात येऊन हा कायदा अधिक कठोर करण्यात येईल, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत दिली होती.

त्यानुसार नागपूरचे हिवाळी अधिवेशन संपताच अन्न व औषध प्रशासन विभाग कामाला लागले आहे. गुटखा उत्पादकांपर्यंत पोहोचण्यासाठी विशेष धोरण आणणार, कायद्यातील त्रुटी दूर करण्यासाठी दुरुस्ती प्रस्ताव आणण्यात येणार असल्याचेही मंत्री नरहरी झिरवाळ म्हणाले.

गुटखा बंदी कायदा कठोर करण्यासाठी व मकोका लावण्यासाठी त्यात आवश्यक ते बदल करून सुधारित प्रस्ताव विधी व न्याय विभागाकडे लवकरात लवकर पाठविण्याचे निर्देश मंत्री नरहरी झिरवाळ यांनी अधिकाऱ्यांना दिले.

## तपस्वी शिल्पकार काळाच्या पडद्याआड - मुख्यमंत्री फडणवीस
## ज्येष्ठ शिल्पकार डॉ राम सुतार यांना श्रद्धांजली



**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.१८, मुंबई :** शिल्पकला क्षेत्रावर आपले आणि महाराष्ट्राचे नाव कोरणारा तपस्वी शिल्पकार काळाच्या पडद्याआड गेला आहे, अशी शोकभावना व्यक्त करत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पद्मश्री, महाराष्ट्रभूषण ज्येष्ठ शिल्पकार डॉ. राम सुतार यांना निधनाबद्दल भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली आहे. दरम्यान, मुख्यमंत्री फडणवीस यांनी सुतार यांचे सुपुत्र अनिल सुतार यांच्याशी दूरध्वनीवरून संपर्क साधून त्यांना सांत्वना दिली.

मुख्यमंत्री शोकसंदेशात म्हणतात, रामभाऊंच्या निधनाने जागतिक कीर्तीचा कलाकार आपल्यातून निघून गेला. प्रमाणबद्धता आणि त्यातील जिवंतपणा हे त्यांच्या कलेचे वैशिष्टय होते. काही दिवसांपूर्वी त्यांना महाराष्ट्र शासनाचा 'महाराष्ट्र भूषण' पुरस्कार प्रदान करण्यासाठी आम्ही त्यांच्या नवी दिल्लीतील निवासस्थानी गेलो होतो, पुरस्कार स्वीकारताना त्यांनी 'महाराष्ट्र माझा' या गीताच्या ओळी उच्चारल्या तेव्हा भारावून गेलो होतो. अनेक शिल्पांना त्यांनी आकार दिला. स्टॅच्यु ऑफ यूनिटीमधील सरदार वल्लभभाई पटेल यांचा पुतळा किंवा अंदमानमधील वीर सावरकर यांचा पुतळा. शंभराव्या वर्षी सुद्धा ते इंदू मिल येथील भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकाच्या कामात गुंतले होते. त्यांनी तयार केलेले अनेक पुतळे संसद भवन परिसरात उभे आहेत. आपले आराध्यदैवत छत्रपती शिवाजी महाराज, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा ज्योतिबा आणि सावित्रीबाई फुले, आपले संत अशा मोठ्या मांदियाळीच्या शिल्पांना आकार देण्याचे काम त्यांनी केले.

या शिल्पांच्या माध्यमातून त्यांची कला शतकानुशतके आपल्या स्मरणात राहील आणि प्रत्येक शिल्प पाहताना त्यांचेच स्मरण होईल, त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो. आम्ही त्यांच्या कुटुंबियांच्या दुःखात सहभागी आहोत, असेही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे.

## बारामतीत पुन्हा एकदा काका - पुतण्याची लढाई...

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१८, बारामती :** बारामती नगरपरिषदेची निवडणूक रस नसलेली निरस वातावरणातील दिसत होती. आता पवार कुटुंबातील लग्नसमारंभाचे काही दिवस सोडल्यास पुन्हा एकदा राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे युवा नेते युगेंद्र पवार हे आपल्या शिलेदारांसाठी रणांगणात उतरले आहेत. युगेंद्र पवार यांच्या सहभागामुळे आता या निवडणुकीत रंगत येईल, अशी स्थिती आहे.

बारामती नगरपरिषदेची निवडणूक अधिकाऱ्यांच्या चुकांमुळे पुढे ढकलली गेली आणि त्याचा फटका उमेदवारांना बसला. काहीही कारण नसताना आणि काहीच बदल झाले नसताना २० दिवस ही निवडणूक पुढे ढकलली गेली. साहजिकच उमेदवारांचा खर्च वाढला आणि मनस्ताप देखील.



या निवडणुकीत अगोदरच राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवारांच्या पक्षाचे ८ उमेदवार बिनविरोध झाले आहे. मात्र या निवडणुकीत म्हणावी तशी रंगत नव्हती. बसपाचे उमेदवार काळुराम चौधरी यांनी राष्ट्रवादी काँग्रेसवर टीका करत वातावरणात काहीशी लढाईची स्थिती आणली. आता मात्र युगेंद्र पवार स्वतः बारामतीच्या मैदानात उतरले आहेत. त्यामुळे साहजिकच या निवडणुकीत चुरस पाहायला मिळेल. काही प्रभागात राष्ट्रवादी ( अजित पवार गट) काँग्रेसमध्ये अंतर्गत वाद आहेत. या वादाचा फटका काही उमेदवारांना बसू शकतो. मात्र शेवटच्या काळात उपमुख्यमंत्री अजित पवार हे डॅमेज कंट्रोल करण्याची शक्यता आहे. ती आज वरची परंपरा आहे. ते वगळता निवडणुकीत फारसे काही उरलेले नाही. अर्थात निवडणूक २० दिवस पुढे ढकलल्यामुळे महाविकास आघाडीने उभे केलेल्या उमेदवारांना दिलासा मिळाला आहे. तो अशा अर्थाने की, शिलेदार तर लढत होते पण ते फक्त पालखीचे भोई आहेत, सुरुवातीला युगेंद्र पवार यांनी या निवडणुकीत भाग घेतला, मात्र त्यांचा विवाह नियोजित असल्याने पहिल्या टप्प्यातील शेवटच्या काही दिवसात महाविकास आघाडीचे उमेदवार एकटेच लढत होते.

आता पुन्हा एकदा त्यांना संधी आली असून युगेंद्र पवार आजपासून पुन्हा या निवडणुकीत उतरले आहेत. या निवडणुकीत महाविकास आघाडीच्या उमेदवारांचा उत्साह वाढवण्यासाठी ही एक मोठी दिलासादायक बाब आहे. युगेंद्र पवार निवडणुकीत उतरल्याने महाविकास आघाडीच्या उमेदवारांचं मतदान काही प्रमाणात नक्की वाढेल. अर्थात या निमित्ताने विधानसभेनंतर माळेगाव कारखानाची निवडणूक झाली आणि त्यानंतर आता बारामती नगर परिषदेच्या निवडणुकीत काका अजित पवारांच्या विरोधात युगेंद्र पवार आव्हान उभं करतील अशी शक्यता आहे. दरम्यान, 'आमचे उमेदवार निवडून येणार, कारण शरद पवारांनी या ठिकाणी शाश्वत विकास केला आहे आणि हा शाश्वत विकास बारामतीकरांना माहित आहे. केवळ इमारती उभ्या राहिल्या म्हणजे विकास नसतो, तर माणंस उभी राहिली पाहिजेत आणि ते करण्याचं काम पवार साहेबांनी केलं आहे. त्यामुळे मतदार आम्हाला कौल देतील', असा विश्वास युगेंद्र पवार यांनी व्यक्त केला आहे. अशा परिस्थितीत बारामतीकर नेमकी काय भूमिका घेतात, हे मात्र २१ डिसेंबर रोजीच निकालातून दिसेल.

## विमाननगर–नगर रोड फिनिक्स मॉल परिसरात भीषण वाहतूक कोंडी

**दि.१८, पुणे :** पुण्यातील अत्यंत गजबजलेल्या नगर रोडपासून विमाननगर आणि फिनिक्स मॉल परिसरापर्यंत आज संपूर्ण संध्याकाळी वाहनचालकांना भीषण वाहतूक कोंडीचा सामना करावा लागला. रस्त्यावर वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या असून, कार्यालयीन सुटीची वेळ, शाळा-महाविद्यालये आणि बाजारपेठेतील गर्दी यामुळे ही परिस्थिती अधिकच बिकट झाली. विशेष म्हणजे, ही कोंडी कोणत्याही पूर्वनियोजित विकासकामांमुळे नसून, प्रशासकीय नियोजनाच्या अभावामुळे निर्माण झाल्याचे स्पष्टपणे दिसून आले.

नगर रोड हा पुण्यातील वाहतुकीचा मुख्य कणा मानला जातो. येरवडा, कल्याणी नगर, विमाननगर आणि वडगाव शेरीकडे जाणारी वाहतूक याच मार्गावरून जाते. मात्र, काही महत्त्वाच्या चौकांमधील सिग्नल व्यवस्था निकामी असल्याने आणि पर्यायी मार्गांचे योग्य नियोजन नसल्याने वाहनचालक तासनतास अडकून पडले. या कोंडीत रुग्णवाहिका, शालेय बस आणि अत्यावश्यक सेवांची वाहनेही अडकल्याने नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे.

बेशिस्तपणा आणि नियोजनाचा अभाव

वाहतूक कोंडीला केवळ रस्ते कारणीभूत नसून, वाहनचालकांचा बेशिस्तपणाही मोठा वाटा उचलत आहे. नो-पार्किंगमध्ये वाहने उभी करणे, रस्त्याच्या मधोमध अचानक यू-टर्न घेणे, लेन शिस्त न पाळणे आणि दुचाकीस्वारांकडून होणारे नियमांचे उल्लंघन यामुळे वाहतूक पूर्णपणे विस्कळीत होते. परिसरात वाहतूक पोलीस उपस्थित असूनही कठोर कारवाई होत नसल्याने नियम मोडणाऱ्यांचे फावते, अशी भावना स्थानिक नागरिकांनी व्यक्त केली आहे.

प्रशासनाची जबाबदारी आणि उपाययोजना

वाहतुकीचा हा गुंता सोडवण्यासाठी नगर रोड आणि विमाननगर परिसरात अतिरिक्त पोलीस बंदोबस्त तैनात करावा, सिग्नल व्यवस्था अद्ययावत करावी आणि बेशिस्त चालकांवर कडक कारवाई करावी, अशी मागणी जोर धरत आहे. केवळ वाहतूक पोलिसांनीच नव्हे, तर पुणे महानगरपालिकेने देखील दक्षता घ्यावी. रस्त्यावरील अतिक्रमण आणि अनधिकृत पार्किंगवर पालिकेने तातडीने कारवाई करणे आवश्यक आहे. जर प्रशासनाने वेळीच पावले उचलली नाहीत, तर हा प्रवास नागरिकांसाठी अधिकच त्रासदायक ठरणार आहे.

## संपादकीय

### पर्टो रिकोची 'स्पॅनिश' ओळख

अमेरिकेचे ५१वे राज्य कोणते असेल? अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या अलीकडच्या विधानांचा संदर्भ देऊन 'कॅनडा' असे उत्तर काही जण देतील; परंतु ते बरोबर उत्तर नाही. या प्रश्नाचं उत्तर आहे : पर्टो रिको. कॅरेबियन समुद्रातील सुमारे १४ हजार चौरस किलोमीटर क्षेत्रफळाचा हा देश गेल्या सव्वाशे वर्षांहून अधिक काळ अमेरिकेच्या आधिपत्याखाली आहे. तो अमेरिकेचाच एक भाग असून, तिथं जन्मलेल्यांना अमेरिकी नागरिक मानले जाते. अमेरिकेची घटना आणि कायदे तिथं लागू आहेत; मात्र तेथील नागरिकांना अमेरिकेच्या अध्यक्षीय निवडणुकीत मतदानाचा अधिकार नाही. या अधिकारासह अमेरिकेचे ५१वे राज्य होण्याची मनीषा पर्टो रिकोची आहे; परंतु अजून त्या दिशेनं काही हालचाल दिसत नाही. त्यामागील एक प्रमुख कारण आहे, भाषेचं.

पर्टो रिको ही मूळ स्पेनची वसाहत. ख्रिस्तोफर कोलंबसनं १४९३मध्ये या बेटाचा शोध लावला. १५०८मध्ये स्पेननं तिथं केलेली वसाहत सुमारे चारशे वर्षं टिकली. अमेरिका-स्पेन युद्धानंतर १८९८मध्ये पर्टो रिकोवर अमेरिकी अंमल सुरू झाला. मात्र, स्पेनच्या प्रदीर्घ राजवटीमुळे या बेटावरील बहुसंख्य आजही स्पॅनिश बोलतात. पर्टो रिको हाही स्पॅनिश शब्द असून, त्याचा अर्थ आहे, संपन्न बंदर. अमेरिकेचा सर्व कारभार इंग्लिशमधून चालत असला, तरी पर्टो रिकोमधील प्रशासनाची भाषा स्पॅनिशच आहे. तेथील सरकारी कामकाज, शिक्षण, सार्वजनिक व्यवहार आणि लोकव्यवहार हे स्पॅनिशमधूनच होतात. पर्टो रिकोवासीयांसाठी स्पॅनिश ही अभिव्यक्तीची, अस्मितेची भाषा आहे. अमेरिकेच्या राष्ट्रकुलाचा भाग होऊन सव्वाशे वर्षे लोटल्यानंतरही त्यांनी आपली स्पॅनिश अस्मिता त्यागून इंग्लिशचा स्वीकार केला नाही. अमेरिकेत असल्यानं तिथं शाळेत एक विषय म्हणून इंग्लिश शिकवली जात असली, तरी तेथील बहुतेकांना ती परकी वाटते.

पर्टो रिको पूर्णपणे इंग्लिश स्वीकारत नाही, तोपर्यंत त्याला अमेरिकेच्या ५१व्या राज्याचा दर्जा मिळणार नसल्याचं विश्लेषण काही अमेरिकी नेते आणि तज्ज्ञ करतात. पेनसिल्व्हानियाचे माजी सिनेटर रिक सँटोरम हे त्यांपैकी एक. 'इंग्लिश ही प्रथम भाषा होत नाही तोवर पर्टो रिकोला अमेरिकी राज्य कसं मानता येईल,' असा सवाल त्यांनी केला होता. पर्टो रिकोची लोकसंख्या ३२ लाख असून, त्यांपैकी ९५ टक्क्यांहून अधिकांची पहिली भाषा स्पॅनिश आहे. पर्टो रिकोतील निम्म्या लोकांना किमान पातळीवरील इंग्लिश समजत असलं, तरी ही भाषा घरी बोलणाऱ्यांचं प्रमाण पाच टक्केही नाही. अशा स्थितीत आपल्यावर इंग्लिश लादण्याचा प्रयत्न अमेरिका करीत असल्याची भावना तिथं जोर धरतेय. शिवाय अमेरिका आपल्याप्रति दुजाभावाची करीत असल्याची तक्रारही वाढतेय. यातूनच अमेरिकी राष्ट्रकुलातून बाहेर पडण्याचा टोकाचा विचार मांडणाऱ्यांना पाठबळ मिळत आहे. मात्र, स्वतंत्र देश होण्याची आकांक्षा पर्टो रिकोवासीयांत नाही. अमेरिकेऐवजी पुन्हा स्पेनचा भाग होऊन युरोपीय महासंघाचे सदस्यत्व मिळविण्याची स्वप्नं तिथं काही लोक पाहत आहेत. यातूनच, स्पेनमधील सामिलीकरणाची चळवळ (अँदालान्ते रियुनियनीफिकेशनिस्ट्स) २०१७मध्ये आकाराला आली; त्यावेळी केलेल्या पाहणीत तेरा टक्के लोकांनी याला अनुकूलता दर्शविली होती.

'आम्ही मनानं स्पेनपासून फार दूर गेलेलो नाही. आम्हाला स्पेनपासून वेगळं व्हायचं नव्हतं,' असा दावा या 'अँदालान्ते' चळवळीचे कार्यकर्ते करीत आहेत. होस लारा हे त्यांपैकी एक. स्पॅनिश भाषेच्या बंधानं आम्ही स्पेनशी जोडले गेल्याचं ते सांगतात. इंग्लिशला अमेरिकेची अधिकृत भाषा करण्याचा निर्णय ट्रम्प यांनी या वर्षी घेतल्यानंतर पर्टो रिकोवासीयांत अस्वस्थता पसरली अन् पुन्हा स्पेनच्या बाजूनं वारे वाहू लागले. मात्र, पर्टो रिकोला अमेरिकेच्या राज्याचा दर्जा मिळविण्याच्या बाजूनं असणारे अजूनही मोठ्या संख्येनं आहेत. त्यांपैकी किती जण स्पेनच्या बाजूनं जातात हे अमेरिकेच्या पर्टो रिकोबाबतच्या भाषाविषयक धोरणावर काही प्रमाणात अवलंबून असेल.

# भारताच्या पराक्रमी इतिहासाची साक्ष देणारे दिल्लीतील शस्त्र प्रदर्शन !



भारतीय इतिहासाचा आणि संस्कृतीचा अभ्यास केल्यास त्याकाळी शस्त्र हा मनुष्याचा दागिना होता. त्यामुळे प्रत्येकाकडेच सोबत शस्त्र असायचे ज्याचा उपयोग स्वरक्षणासाठी केला जात असे. त्याकाळी स्त्रियांकडेही वेगळ्या धाटणीची शस्त्रे असत. ही शस्त्रे सोबत कंगवा बाळगावा तशी बाळगली जात नसत तर ती चालवण्याचे प्रशिक्षण आणि मानसिक बळ प्रत्येकाकडे असे. प्रत्येकाकडे शस्त्र असले, तरी त्याचा वापर इतरांवर अन्याय करण्यासाठी किंवा अधिकार गाजवण्यासाठी केला जात नसे. पूर्वीच्या काळात युद्ध होत असत आणि या युद्धात विविध प्रकारची शस्त्रे आणि अस्त्रे यांचा वापर केला जात असे. प्रदेशागणिक शस्त्रे आणि अस्त्रे यांचे स्वरूप आणि युद्धकलेचे प्रकार वेगवेगळे असले, तरी शत्रूला नेस्तनाबूत करणे हा उद्देश सामायिक होता. त्याकाळी गुरुकुल शिक्षण पद्धती होती. युद्धकलेचे आणि शस्त्रे-अस्त्रे चालवण्याचे प्रशिक्षण गुरुकुलातूनच मिळत असे. रामकृष्णादि अवतारांनीही युद्धकलेचे शिक्षण गुरुकुलातून घेतलेल्याचे संदर्भ प्राचीन ग्रंथांतून मिळतात. आपल्या राज्याचे पर्यायाने राष्ट्राचे शत्रूपासून रक्षण करायचे असेल तर युद्धकला अंगी असणे आणि शस्त्रे चालवता येणे क्रमप्राप्त होते. शौर्य हे भारताचे एक प्रमुख वैशिष्ट्य आहे.

भारतभूमीवर आजतागायत अनेक युद्ध झाली. त्या प्रत्येक युद्धातून भारतीयांचा पराक्रम उजळून निघाला आहे. भारतभूमीत झालेल्या राजा महाराजांच्या पराक्रमाच्या आणि शौर्याच्या कथा आपण इतिहासातून अभ्यासल्या आहेत. छत्रपती शिवाजी महाराजांनी मूठभर मावळ्यांच्या मदतीने पाच पातशाह्यांना महाराष्ट्र भूमीत लोळवले. संख्याबळ अपुरे आणि लक्ष मोठे असल्याने त्यांनी गनिमीकावा या आगळ्या युद्धप्रकाराचा शोध लावला ज्यामुळे कमीतकमी शस्त्र आणि मनुष्य बळाच्या साहाय्याने शत्रूची अधिकाधिक हानी करता येत होती. मावळ्यांना सहज हाताळता येतील अशी हलकी आणि परिणामकारक शस्त्रे महाराजांनी स्वतः च्या देखरेखीखाली बनवून घेतली होती. इतिहासपुरुष देहरूपाने आज आपल्यात नसले, तरी त्यांच्या पराक्रमाची साक्ष देणारी, त्यांनी वापरलेली, त्यांचा हस्तस्पर्श लाभलेली शस्त्रे, चिलखत. जिरेटोप आजही शाबूत आहेत आणि ही सारी शस्त्रे त्यांनी गाजवलेल्या पराक्रमाची आणि मातृभूमीसाठी केलेल्या निस्सीम त्यागाची आठवण करून देतात. ही शस्त्रे म्हणजे या भारतीय योध्यांच्या पराक्रमाचा अनमोल ठेवा आहेत. इतिहास पुरुषांच्या वंशजांनी आणि काही इतिहासप्रेमींनी तो जतन करून ठेवला आहे. हा ठेवा दिल्लीत पहिल्यांदा उलगडला गेला. निमित्त होते सनातन संस्था आयोजित सनातन राष्ट्र शंखनाद महोत्सवाचे. १४ ते १६ डिसेंबर या कालावधीत दिल्लीतील भारत मंडपम च्या हॉल क्रमांक १२ मध्ये 'स्वराज्याचा शौर्यनाद' या नावाने इतिहासकालिन शस्त्रांचे, अस्त्रांचे आणि संरक्षणविषयक साहित्यांचे भव्य प्रदर्शन भरवण्यात आले होते. छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळातील सुमारे १५०० हुन अधिक शास्त्रे या ठिकणी प्रदर्शनात मांडण्यात आली होती. १८५७ च्या पहिल्या बंडातील आद्यक्रांतीकारी मंगल पांडे यांनी वापरलेली बंदूक आणि मध्य प्रदेशच्या राजघराण्यातील मल्हारराव होळकर, तसेच क्रांतीसिंह नाना पाटील यांनी वापरलेल्या बंदूका प्रथमच दिल्लीकरांना या प्रदर्शनातून पाहायला मिळाल्या. छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वतः स्पर्श करून सरसेनापती हंबीरराव मोहिते यांना दिलेली तलवार, ढाळ, दांडपट्टा, कट्यार, बंदूक, २ तोफा यांचाही या प्रदर्शनात समावेश आहे.महाराणा प्रताप आणि विजयनगर साम्राज्यकालीन शस्त्रेही या ठिकाणी ठेवण्यात आली होती. ही शस्त्रे प्रदर्शनात केवळ दाखवण्यासाठी ठेवण्यात आली नव्हती तर ती हाताळण्याची संधीही प्रदर्शन पाहण्यास आलेल्यांना देण्यात आली होती. या शस्त्रांच्या केवळ स्पर्शाने रोमांच उभे राहिल्याचे यावेळी अनेकांनी सांगितले. या प्रदर्शनाला भारताचे माजी सरन्यायाधीश श्री. उदय लळीत, केंद्रीय सांस्कृतिक मंत्री श्री. गजेंद्रसिंह शेखावत, केंद्रीय उर्जा राज्यमंत्री श्री. श्रीपाद नाईक, केंद्रीय संरक्षण राज्यमंत्री श्री. संजय सेठ, राज्यसभा सदस्य, तसेच भाजपाचे राष्ट्रीय प्रवक्ते श्री. सुधांशू त्रिवेदी, दिल्लीचे सांस्कृतिक मंत्री श्री. कपिल मिश्रा यांसह संत-महंत, प्रशासकीय अधिकारी, वरिष्ठ पत्रकार, संपादक, साहित्यिक, पोलीस अधिकारी, उद्योगपती, अधिवक्ते, लष्करी अधिकारी, हिंदू संघटनांचे प्रमुख यांनी हजेरी लावली. दिल्लीतील अनेक शाळा प्रशासनांनी विद्यार्थ्यांसह शिक्षकांनाही या शस्त्र प्रदर्शनाचा लाभ घेण्यासाठी पाठवले होते. दिल्लीचे सांस्कृतिक मंत्री श्री. कपिल मिश्रा यांनी दिल्लीत कायम स्वरुपी 'शिवकालीन शस्त्रसंग्रहालय' स्थापन करण्याचे आश्वासन यावेळी दिले. भारताला लाभलेल्या इतिहासपुरुषांचा पराक्रम उलगडून सांगणारी ही शस्त्रे पाहिल्यावर अनेकांचा उर भरून येत होता. काहींचे डोळे पाणावले होते. १८७८ मध्ये इंग्रजानी भारतात शस्त्रबंदी अधिनियम आणला भारतीयांच्या हातातील शस्त्र हिरावून घेतली. शस्त्र बाळगणे गुन्हा ठरू लागले अशा काळातही आपल्या क्रांतिकारकांनी इंग्रजांच्या नाकी नऊ आणले होते. इंग्रजांनी आणलेली शस्त्रबंदी आज स्वतंत्र भारतातही अबाधित आहे. परिणामी शौर्याचा काळ हा इतिहास बनून राहिला आहे. हा शौर्याचा इतिहास जागवण्यासाठी आणि नागरिकांत त्याविषयी अभिमान जागृत करण्यासाठी अशा प्रकारच्या शस्त्र प्रदर्शनाचे प्रत्येक जिह्यात आणि तालुक्यात आयोजन करण्याची आवश्यकता आहे.

**- जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई**
**संपर्क क्रमांक : ९६६४५५९७८०**

# नशेला प्रोत्साहन देणारा 'सनबर्न फेस्टिव्हल'

## वाचक पत्र

आशिया खंडातील सर्वात मोठा इलेक्ट्रॉनिक डिजिटल म्युझिक शो म्हणून ख्याती असलेला सनबर्न फेस्टिवल १९ तारखेपासून मुंबईतील शिवडी परिसरात सुरु होत आहे. यापूर्वी गोव्यात आणि त्यानंतर पुण्यात झालेल्या या फेस्टिवलच्या निमित्ताने अनेक वाद चव्हाट्यावर आले होते. ज्यांचे निराकरण अद्यापही झाले नसताना महाराष्ट्र सरकारने या फेस्टिवलला दिलेली परवानगी मनात संशय निर्माण करणारी आहे. या फेस्टिवलविषयी अधिक माहिती जाणून घेण्याकरिता गूगल सर्फींग केले असता या फेस्टिवल दरम्यान घडलेल्या अनेक धक्कादायक बाबी लक्षात आल्या. मुंबईत होणाऱ्या या फेस्टिवलचे एका दिवसाचे तिकीटदर २ हजार रुपयांपासून आठ लाख २६ हजारापर्यंत आहेत. जेव्हढी महागडी तिकीट काढू तितक्या लक्झरी सेवा आयोजकांकडून पुरवण्यात येणार आहेत.

लक्झरी सेवांचा दर जसा वाढतो तशी आयोजकांकडून देण्यात येणाऱ्या मद्याच्या बाटल्यांची संख्याही वाढत जाते. सनबर्नच्या संकेतस्थळावरील छायाचित्रे पाहिल्यावर अनेक छायाचित्रांत मद्यधुंद अवस्थेतील तरुणी तोकड्या कपड्यांत नाचताना दिसतात. मुंबईत या फेस्टिव्हलच्या प्रवेशाकरिता १६ वर्षांची किमान मर्यादा ठेवण्यात आली आहे.

मद्य घेण्याकरिता राज्य उत्पादन शुल्क विभागाने २१ वर्षे वयाची अट आखून दिली असताना मद्याचा मुक्त वापर होतअसलेल्या या फेस्टिवलला १६ वर्षापर्यंतची सूट दिलीच कशी हाही प्रश्न यानिमित्ताने निर्माण होतो. पौगंडावस्थेतील मुला मुलींनी तोकड्या कपड्यात या ठिकाणी यावे आणि मद्यधुंद व्हावे यासाठी या फेस्टिवलचीं जाहिरात प्रोत्साहन देत आहे. या फेस्टिवलचा इतिहास पाहता याठिकाणी मद्यासह अमली पदार्थही छुप्या मार्गाने पुरवले जातात. एकूणच राज्याच्या मुलामुलींना नशेखोरीकडे नेण्याचे षडयंत्रच या फेस्टिवलच्या माध्यमातून आखले आहे की काय असा प्रश्न पडल्यावाचून राहात नाही. युवापिढीला नासवणाऱ्या सनबर्न फेस्टिवलच्या विरोधात संस्कृतीप्रेमी युवकांचा समूह एकवटला आहे.

सोशल मीडियावर या फेस्टिवलचे धोके समजावून सांगितले जात आहेत. या फेस्टिवलचीं परवानगी रहित करण्याची मागणी केली जाऊ लागली आहे. युवावर्गाचा एकूणच रोष पाहता सरकारने सनबर्नला मुंबईत दिलेलया परवानगीचा फटका महायुतीला मुंबई महानगरपालिका निवडणुकीला बसण्याची शक्यता नाकारता येत नाही.

**- नरेश घरत, चेंबूर**

## पुस्तक भेट

पुस्तक महोत्सवांस
आवर्जून देतोयं भेट
कित्येक साहित्यिक
प्रत्यक्षांत भेटतीथेट

निवडक पुस्तकेग्रंथ
आप्तमित्रा देतो भेट
घ्यावीवाटती पुस्तके
नसून पर्याप्त बजेट

पर्वणी चोखंदळांना
जणूं अनमोल इस्टेट
धन्यवाद आयोजकां
उघडले सौख्याचेगेट

निवड करणे कठीण
रे कुठली संपदा ग्रेट
हवीहोती ऐपत भली
कधीकधी वाटे रिग्रेट

समुहात करुन खरेदी
घडवून आणावे समेट
पुस्तके देवाण घेवाण
शोधूया मार्ग घेलाशेट

कमल फूल सरोवरात
मधोमध हे मोहक बेट
विविधांगी व्यजनांनी
सुशोभित अधिकप्लेट

**- हेमंत मुसरीफ पुणे.**
**९७३०३०६९९६.**

अक्षराज
अचूक बातमी

# शिक्षणातूनच परिवर्तन होते...

आपल्या आजूबाजूला अशी अनेक कुटुंबे असतील, ज्यांच्यामध्ये मागील दहा-वीस वर्षांत झपाट्याने आणि सर्वार्थाने परिवर्तन झालेले दिसते. एखाद्या रिक्षाचालकाची मुलगी सी.ए. झाली असेल आणि त्याची परिस्थिती झटक्यात बदलली असेल. घरावरील पत्रे जाऊन स्लॅब पडला असेल किंवा त्या जागी नवीन टोलेजंग दुमजली बंगला उभा राहिलेला असेल. एखाद्या भाजी विक्रेत्याचा मुलगा शिकून न्यायाधीश झाला असेल, त्यामुळे त्याच्या घराकडे शहरातील मोठमोठे पुढारी ये-जा करत असतील. त्याच्या बोलण्यात, वागण्यात, कपड्यांत आणि एकूणच बॉडी लँग्वेजमध्ये बदल झालेला दिसत असेल. एखाद्या गावकुसाबाहेरील दलित वस्तीतील मजुरी करणाऱ्याचा मुलगा मोठा अधिकारी झाला असेल, त्यामुळे त्याची गावातील पत अचानक उंचावली असेल. पूर्वी कोणीही त्याचा विचार करत नव्हते; परंतु आता मात्र गावातील सर्व सार्वजनिक कार्यक्रमांत, लग्नसमारंभांत आणि गावच्या विकासकामांत त्याला आवर्जून मानसन्मान देऊन बोलावले जात असेल.एखाद्या शाळेतील शिक्षकांचा मुलगा शिक्षणाधिकारी झाला असेल, त्यामुळे त्या शिक्षकाकडे आता त्याच शाळेतील शिक्षक 'साहेबांचा बाप' म्हणून पाहू लागले असतील. एखाद्या हवालदाराचा मुलगा पोलीस अधिकारी बनून आपल्या बापाला सॅल्यूट ठोकून त्यांचा आशीर्वाद घेत असेल. एखाद्या गॅरेजवाल्याचा मुलगा इंजिनीअर बनून एखाद्या मोठ्या ऑटोमोबाईल कंपनीच्या सल्लागार मंडळात उच्च पदावर गेला असेल. तो आपल्या बापाच्या गॅरेजमध्ये येऊन, मळके कपडे घातलेल्या बापाच्या काळाकुट्ट हातातील पाना आणि पक्कड खाली ठेवण्याची विनंती करत असेल.

वरीलप्रमाणे अशा लाखो सत्य घटना शिक्षणातून घडलेल्या परिवर्तनाच्या आपण ऐकत व पाहत आलो आहोत. शिक्षणातून परिवर्तन झालेल्या कुटुंबांमध्ये केवळ भौतिकच नव्हे, तर नैतिक, सामाजिक, वैचारिक आणि सांस्कृतिक पातळीवरही बदल झालेला असतो. शिक्षणातून झालेले परिवर्तन मजबूत पायावर उभे असते.

हजारो वर्षांचा सर्वार्थाने मागासलेपणा दूर झालेला असतो. शिक्षणातून घडलेली पिढी सदाचारी, सुसंस्कृत आणि विवेकी असते. शिक्षणातून केवळ एखाद्या व्यक्तीचे किंवा एका कुटुंबाचेच नव्हे, तर समाज आणि राष्ट्राच्या चौफेर प्रगतीस हातभार लागतो. शिक्षणातून परिवर्तन झालेल्या कुटुंबांकडे पाहून आजूबाजूचे आणि नातेवाईक प्रेरणा घेतात व आपल्या मुलांना शिकवू लागतात.

शिकून एखादा वैज्ञानिक घडतो आणि एखाद्या असाध्य आजारावर औषध शोधतो. एखादा इंजिनीअर घडतो आणि दुर्गम गावांपर्यंत पोहोचण्यासाठी किफायतशीर रस्ते निर्माण करतो किंवा वीजपुरवठा करतो. एखादी व्यक्ती शिकून इतिहाससंशोधक बनते आणि चुकीच्या इतिहासमांडणीमुळे समाजातील दोन घटकांमध्ये निर्माण झालेली दरी खरा इतिहास उजेडात आणून दूर करते. समाजात सलोखा व सौहार्द निर्माण करते. एखादा शिकून मोठा अर्थतज्ज्ञ होतो आणि देशातील आर्थिक विषमता दूर करण्यासाठी नवे सूत्र मांडतो, शासनाला सल्ला देतो आणि देशाची आर्थिक घडी बसवण्यास मदत करतो.

खरंतर, आपल्या मुलांना शाळेत पाठवणे हे पालकांचे घटनात्मक कर्तव्य आहे. आजही भारतात रोजगारासाठी होणारे स्थलांतर आणि शिक्षणाविषयीचे अज्ञान यामुळे अनेक मुले शिक्षणापासून वंचित राहतात. अशा परिस्थितीत पाल्यांना शाळेत दाखल न केल्याबद्दल पालकांना दंडित करणे म्हणजे त्यांना दारिद्र्याची शिक्षा देण्यासारखे ठरेल.या संदर्भात प्रसिद्ध शिक्षणतज्ज्ञ जे. पी. नाईक यांचे विधान महत्त्वाचे आहे. ते म्हणतात, जर आई-वडिलांना मुलांना शिक्षण न दिल्याबद्दल कैदेची शिक्षा दिली, तर जेवढी मुले शाळेत असतील, त्यापेक्षा अधिक आई-वडील कैदेत असतील.

आज आपल्या देशात मोठ्या प्रमाणावर शाळाबाह्य मुले आहेत. अशा परिस्थितीत 'शिक्षणातूनच सर्वार्थाने परिवर्तन होते' हे समाजाला पटवून देण्याचे काम शिक्षणव्यवस्थेतील प्रत्येक घटकाने निर्धारपूर्वक केले पाहिजे. त्याचबरोबर प्रवेशित सर्व मुलांना दर्जेदार शिक्षण देण्याचा प्रयत्न केला पहिजे कारण दक्षिण आफ्रिकेतील एका विद्यापीठाच्या प्रवेशद्वारावर विचारासाठी एक संदेश चिकटवण्यात आला होता,तो असा होता-

एखाद्या देशाला नष्ट करायचे असेल तर त्यासाठी अणुबॉम्ब किंवा लांब

पल्ल्याची क्षेपणास्त्रे डागावी लागत नाहीत. केवळ शिक्षणाचा दर्जा खालावण्याची व्यवस्था केली आणि परीक्षेत मुलांना कॉपी करण्याची मोकळीक दिली तरी हे शक्य होते.

अशा शिक्षणपद्धतीतून तयार झालेल्या डॉक्टरांच्या हातून रुग्णांचे मृत्यू होतात. अशा अभियंत्यांनी बांधलेल्या इमारती कोसळतात.

अशा शिक्षण पद्धतीतून आलेले अकाऊंटंट आणि अर्थशास्त्रज्ञांकडून पैशाची नासाडी होते.अशा देशांमधील धार्मिक प्रवचनकारांकडून मानवतेची हत्या होते. न्यायाधीशांकडून न्याय मिळत नाही. शिक्षणव्यवस्था कोलमडून पडली की, सगळे राष्ट्र कोलमडून पडते.

दर्जेदार शिक्षणातूनच व्यक्तीच्या जीवनात, समाजात आणि देशामध्ये परिवर्तन होते.

**- किशोर जाधव, सोलापूर**
**- मो. नं. ९९२२८८२५४१**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा' अभियानात प्राथमिक शाळेचे यश




**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१८, मुंबई :** राज्य शासनाच्या महत्त्वाकांक्षी 'मुख्यमंत्री माझी शाळा,सुंदर शाळा' अभियानात घाटकोपर पंतनगर येथील शिवाजी शिक्षण संस्था प्राथमिक विद्यालयाने तालुका स्तरावर १५० पैकी १२६ गुण मिळवून एन विभाग खाजगी अनुदानित मराठी माध्यम प्राथमिक शाळांमध्ये प्रथम क्रमांक पटकावत उज्वल यश संपादन केले आहे. शाळेचा नियोजनबद्ध कारभार, स्वच्छ व सुंदर परिसर, नाविन्यपूर्ण शैक्षणिक उपक्रम, इ. शिशुपासून सेमी इंग्लिश माध्यम, अद्ययावत क्रीडांगण व ओपन जीम, अद्ययावत भौतिक सुविधा, दर्जेदार गुणवत्तापूर्ण शिक्षण, मूल्यवर्धन उपक्रम, डिजिटल शाळा, पर्यावरण संवर्धन आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाच्या निकषांवर शाळेने केलेल्या उत्कृष्ट कामगिरीची दखल घेत शासनातर्फे शाळेला रोख रू. ३ लाख रुपयांचे प्रथम क्रमांकाचे पारितोषिक देऊन गौरविण्यात आले.

संस्थेचे अध्यक्ष शरद फाटकयांचे मार्गदर्शन तसेच संस्थेचे उपाध्यक्ष पांडुरंग गांवकर, सचिव श्रीकांत नरे, खजिनदार विकास फाटक तसेच संस्थेचे इतर सर्व सदस्य यांचा सातत्यपूर्ण पाठिंबा व सहकार्य लाभले होते,तसेच प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक रवींद्र बडवे व माध्यमिक विभागाचे मुख्याध्यापक संतोष भारमळ यांच्या मार्गदर्शनाखाली आणि सर्व विभागांचे शिक्षकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी व पालक यांच्या एकत्रित प्रयत्नांतून हे यश साकार झाले. हा सन्मान आमच्या सर्वांच्या सामूहिक कष्टांचा आहे,मिळालेले पारितोषिक विद्यार्थ्यांच्या उज्वल भविष्यासाठी व शालेय सुविधांच्या अधिक बळकटीकरणासाठी वापरण्यात येईल, अशी भावना मुख्याध्यापक रवींद्र बडवे यांनी व्यक्त केली.

## गोवंश जनावरांच्या अवैध वाहतुकीवर पोलिसांची कारवाई ; ६ जनावरांची सुटका

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.१८, चंद्रपूर :** जिल्ह्यातील विरूर पोलिसांना १७ डिसेंबर रोजी मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे पोलीस स्टेशन विरुर हद्दीत पेट्रोलींगवर असताना एक टाटा इंट्रा वाहन क्रं. एमएच/३४/बीझेड/९४९०, याला थांबवून पंचासमक्ष तपासणी केली असता, त्यामध्ये ६ नग गोवंशीय जनावरे (बैल) कत्तलीसाठी अवैधरित्या वाहतुक करुन नेत असताना मिळून आल्याने वाहन चालकाच्या ताब्यातून जनावरे किं. अं.१ लाख, ५० हजार आणि वाहतुकीसाठी वापरलेले वाहन किं.अं.७ लाख, ५० हजार, असा एकूण ९ लाखांचा माल जप्त करून आरोपी वाहन चालकाविरुद्ध संबंधीत कलमान्वये पोलीस स्टेशन विरुर येथे गुन्हा नोंदविण्यात आला असून पूढील तपास विरुर पोलीस करीत आहेत.

सदरची कारवाई जिल्हा पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, अपर पोलीस अधीक्षक ईश्वर कातकडे, यांच्या मार्गदर्शनात सहपोनि. संतोष वाकडे यांच्या नेतृत्वात विरुर पोलीस स्टेशन मधील अंमलदारांनी केली आहे.

## धनोजे कुणबी समाज बाबुपेठ विभागाची उपशाखा कार्यकारणी गठीत



**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.१८, चंद्रपूर :** धनोजे कुणबी समाज चंद्रपूर जिल्हा अंतर्गत धनोजे कुणबी समाजाची गाव/वॉर्ड तिथे उपशाखा उपक्रमा अंतर्गत नुकतीच महादेव मंदिर बाबुपेठ, चंद्रपूर येथे विभागाची वॉर्डातील जेष्ठ समाज बांधव, समाजातील प्रतिष्ठित नागरिक, आजी - माजी लोकप्रतिनिधी, कर्मचारी आणि धनोजे कुणबी समाज चंद्रपूरचे अध्यक्ष श्रीधरराव मालेकर, उपाध्यक्ष संजय ढवस, सदस्य ॲड. देवा पाचभाई, माजी सहसचिव भाविक येरगुडे, माजी सदस्य विलास माथनकर, केशवराव मत्ते, कोमल मोहितकर यांच्या उपस्थितीत बैठक पार पडली. धनोजे कुणबी समाजाचे एकत्रीकरण करून समाजाला सामाजिक, शैक्षणिक, व्यावसायिक तसेच आर्थिक सर्वच क्षेत्रात सक्षम कसे करता येईल यावर सर्वांनी आपले मनोगत व्यक्त केले. तसेच धनोजे कुणबी समाजाचे अध्यक्ष श्रीधरराव मालेकर यांनी समाजाची पतसंस्था आणि त्याचे उद्दिष्ट समाज बांधवाना पटवून सांगितले व समाज सदस्य नोंदणीत सहभागी होण्याचे आव्हान केले.

त्यानंतर धनोजे कुणबी समाज बाबुपेठ विभागाची कार्यकारणी पुढील प्रमाणे गठीत करण्यात आली. त्यात अध्यक्षपदी मुकेश गाडगे, उपाध्यक्ष तुळशीराम पिंपळकर, साईनाथ उपरे, सचिन ढेंगळे, सचिव मंगेश देरकर, सहसचिव शैलेश ताजने तर सदस्यपदी सुभाष ढवस, रविंद्र वनसिंगे, सुरेंद्र लांडे, गणेश हिंगाने, सुधीर साळवे, अमोल ढोके, प्रकाश निब्रड, वैभव डाहूले, मनिष थेरे, श्रीकांत पिंपळशेंडे, नत्थूजी एकरे, विनोद लोहे, प्रभाकर विधाते, नितीन पोले, मंगेश बदकी यांची निवड करण्यात आली.

यानंतर चंद्रपूर शहर आणि तालुका मध्ये प्रत्येक गावात धनोजे कुणबी समाजाची उपशाखा स्थापन करून समाजाला एकत्रित करण्याकरिता मोठया प्रमाणात प्रयत्न केले जातील आणि त्या करिता सर्वच प्रकारचे सहकार्य करण्याचे आश्वासन धनोजे कुणबी समाज लक्ष्मीनगरचे उपाध्यक्ष संजय ढवस यांनी प्रास्ताविक भाषणामधून मधून व्यक्त केले.

## जिल्हाधिकारी कार्यालयात राष्ट्रीय अल्पसंख्याक हक्क दिवस साजरा

**दि.१८, बुलढाणा :** जिल्हा अल्पसंख्याक कक्षाच्या वतीने आयोजित राष्ट्रीय अल्पसंख्याक हक्क दिवस जिल्हाधिकारी कार्यालय, बुलढाणा येथे मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची ठळक वैशिष्ट्ये : अपर जिल्हाधिकारी सुधीर खांदे यांच्या अध्यक्षतेखाली कार्यक्रम संपन्न, शालेय भाषण व गीतगायन स्पर्धेतील विजेत्या विद्यार्थिनींचा गौरव, नगरपरिषद उर्दू शाळेतील विद्यार्थिनींच्या सादरीकरणाने कार्यक्रमाची सुरुवात, विविध मान्यवरांचे मार्गदर्शन व मनोगत, अध्यक्षीय भाषणात अपर जिल्हाधिकारी सुधीर खांदे यांनी, राष्ट्रीय अल्पसंख्याक हक्क दिवस एकतेचा व सौहार्दाचा संदेश देणारा दिवस असून अल्पसंख्याक समाजाच्या समस्या सोडविण्यासाठी जिल्हा प्रशासन कटिबद्ध आहे, असे स्पष्ट केले. कार्यक्रमात मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळ, जैन आर्थिक विकास महामंडळ, जिल्हा परिषद शिक्षण विभागाच्या विविध योजनांची माहिती देण्यात आली.

# चंद्रपूर शहराच्या सर्वांगीण विकासासाठी सर्व सज्जन शक्ती एकत्र येणार : आ.जोरगेवार

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.१८, चंद्रपूर :** वाढदिवसाच्या निमित्ताने भारतीय जनता पार्टी, चंद्रपूर महानगरतर्फे आयोजित करण्यात आलेला हा पक्षप्रवेशाचा भव्य कार्यक्रम माझ्यासाठी अत्यंत भावनिक, आनंदाचा आणि जबाबदारीची जाणीव करून देणारा आहे. आज हा दिवस पक्षवाढीचा, विचारवाढीचा आणि लोकशक्ती एकत्र आणणारा दिवस ठरला, याचा मला विशेष अभिमान वाटतो.

चंद्रपूर शहराच्या सर्वांगीण विकासासाठी भारतीय जनता पक्ष हाच एकमेव पर्याय असून, यासाठी सर्व सज्जन शक्ती एकत्र येणार आहेत, असे प्रतिपादन आ. किशोर जोरगेवार यांनी केले. नव्याने सुरू करण्यात आलेल्या गांधी चौकाजवळील मिलन चौकातील भारतीय जनता पार्टी, चंद्रपूर महानगरच्या कार्यालयात भव्य पक्षप्रवेश कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी ते बोलत होते. यावेळी भारतीय जनता पक्षाचे महानगर अध्यक्ष सुभाष कासनगोट्टूवार, जिल्हा मध्यवर्ती बँकेचे



अध्यक्ष रविंद्र शिंदे, माजी महापौर राखी कंचर्लावार, रघुवीर अहिर, भाजप नेते प्रकाश देवतळे, दशरथसिंह ठाकूर, महामंत्री मनोज पाल, सविता दंढारे, श्याम कणकम, नामदेव डाहुले आदींची मंचावर उपस्थिती होती.

यावेळी विविध पक्षांतील तसेच विविध सामाजिक क्षेत्रातील मान्यवरांनी भारतीय जनता पार्टीवर विश्वास ठेवत पक्षात प्रवेश केला. यात माजी नगरसेवक अनिल दडमल, शिवसेना युवासेनेचे विभागीय अध्यक्ष निलेश बेलखेडे, किसान काँग्रेसचे शहर जिल्हाध्यक्ष भालचंद दानव, वैशाली सचिन पाटील, डॉ. प्रा. संजीव दादाजी खोब्रागडे, आरपीआय (आठवले) चे जिल्हा युवा उपाध्यक्ष अमितकुमार सरकार, जिल्हा सरचिटणीस प्रकाश मडावी, माजी नगरसेवक पितांबर कश्यब, संगपाल गेडाम, रजत टेंभुर्णे, अलका अविनाश जिंजीलवार तसेच विद्यार्थी चळवळीतील लढवय्ये नेतृत्व प्रलय म्हशाखेत्री यांनी शेकडो कार्यकर्त्यांसह भारतीय जनता पक्षात प्रवेश केला.

यावेळी पुढे बोलताना आ. जोरगेवार म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदीजी आणि महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सक्षम, दूरदृष्टीपूर्ण आणि विकासाभिमुख नेतृत्वावर विश्वास ठेवून आज अनेक कार्यकर्ते भारतीय जनता पार्टीत सहभागी होत आहेत, ही बाब देश व राज्य योग्य दिशेने जात असल्याचा ठोस पुरावा आहे. भाजपा ही केवळ राजकीय पक्ष नाही, तर सेवा, समर्पण आणि राष्ट्रनिर्मितीची चळवळ आहे.

आज पक्षात प्रवेश करणारे सर्व सहकारी हे समाजाशी जोडलेले, जनतेसाठी काम करणारे आणि परिवर्तनाची आस असलेले कार्यकर्ते आहेत. त्यांच्या अनुभवाचा, त्यांच्या ताकदीचा आणि त्यांच्या विचारांचा पक्षाला निश्चितच फायदा होईल. चंद्रपूरचा सर्वांगीण विकास, युवकांचे भविष्य, शेतकऱ्यांचे प्रश्न, महिला सक्षमीकरण आणि सामाजिक न्याय या सर्व विषयांवर आपण सर्वजण एकत्रितपणे काम करू, असा मला पूर्ण विश्वास आहे. भारतीय जनता पार्टीत कार्य करताना पदापेक्षा कर्तव्य मोठे आहे. सत्ता नव्हे, तर सेवा हेच आपले ध्येय आहे. जनतेच्या विश्वासाला पात्र ठरणे हीच खरी राजकारणाची परीक्षा असल्याचे ते यावेळी म्हणाले. या कार्यक्रमात भारतीय जनता पक्षाच्या पदाधिकाऱ्यांची व कार्यकर्त्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# राज्यातील महत्वपूर्ण सात जिल्ह्यांतील आदिवासी व अती दुर्गम भागातील बालमृत्यूचे वाढते प्रमाण धक्कादायक!



एकीकडे सरकार सांगते की महाराष्ट्राचा विकास मोठ्या झपाट्याने होत आहे.तर दुसरीकडे आदिवासी व अती दुर्गम भागातील रहिवाशांची हालत अत्यंत खस्ता असल्याचे बालमृत्यूच्या वाढत्या प्रमाणावरून लक्षात येते.राज्यातील महत्वपूर्ण सात जिल्ह्यांमध्ये गेल्या तीन वर्षांत तब्बल १४५२६ बालमृत्यू झाल्याची धक्कादायक माहिती सार्वजनिक आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी हिवाळी अधिवेशनाच्या दरम्यान १२ डिसेंबरला विधानसभेत लेखी उत्तरात दिली.

२०२२-२३ ते २०२४-२५ या कालावधीत पुणे, मुंबई, छत्रपती संभाजीनगर, नागपूर, अमरावती, अकोला व यवतमाळ अशा नामांकित जिल्ह्यांमध्ये वाढते बालमृत्यूचे प्रमाण अत्यंत चिंताजनक व गंभीर बाब आहे.बालमृत्यूचे अनेक कारणे असू शकतात परंतु या संपूर्ण कारणांकडे सरकारने दुर्लक्ष केल्यामुळे बालमृत्यू वाढल्याचे दिसून येते. बालमृत्यूच्या वाढत्या प्रमाणावरून लक्षात येते की सरकारच्या निष्काळजीपणामुळे या सातही जिल्ह्यामध्ये आरोग्य सुविधा संपुर्णपणे ढासळलेली असुन अस्तव्यस्त अवस्थेत असल्याचे स्पष्ट दिसून येते.यावरून स्पष्ट होते की या सात जिल्ह्यांमध्ये ३ वर्षांच्या काळात १४५२६ बालमृत्यू झालेत, तर या अगोदर कितीतरी बालमृत्यू झाले असावे याची गणना आणखी धक्कादायक असु शकते.त्यामुळे बालमृत्यूचे वाढते प्रमाण हा अत्यंत गंभीर आणि चिंतेचा विषय आहे.आपण जेव्हा राज्याच्या विकासाची भाषा बोलतो आणि करतो तेव्हा सर्वच स्तरातून विकास होणे आवश्यक असते परंतु तसे झालेच नाही.

त्यामुळे या सात जिल्ह्यांमध्ये आरोग्याच्या दृष्टीने सरकारचे लक्ष आतापर्यंत का गेले नाही? राज्यात मोठमोठ्या आरोग्य सुविधांची घोषणा केली जाते त्या या ठिकाणी का करण्यात आल्या नाहीत? ज्या आदिवासी भागात किंवा अती दुर्गम भागात आरोग्य योजनेची आवश्यकता आहे त्या का पोहचल्या नाही? आणि सरकारने आतापर्यंत या बाबतची कठोर चौकशी का केली नाही?असे अनेक प्रश्न वाढत्या बालमृत्यूच्या प्रमाणावरून उपस्थित होतात.राज्याचा विकास झालाच पाहिजे यात दुमत नाही आणि होत आहे परंतु विकासासोबतच आरोग्य सुविधा सुदृढ व्हायलाच हवी. अती दुर्गम भागातील व आदिवासी भागातील अशी गंभीर परिस्थिती पहाता अंगावर शहारे येतात.

यावरून स्पष्ट होते की, सरकार व त्या जिल्ह्यातील लोकप्रतिनिधी व जनप्रतिनिधी तेथील रहिवाशांवर पुर्णपणे दुर्लक्ष करीत असावेत. त्यामुळेच ही गंभीर परिस्थिती उध्दभवत असावी असे मला वाटते. सरकारने राज्यात अनेक योजना आणल्यात आणि राबवित सुध्दा आहेत ही आनंदाची बाब आहे याचे स्वागतच.परंतु या सात जिल्ह्यांतील बालक मृत्यूशी झुंज देतात हे सरकारला आतापर्यंत कसे काय दिसले नाही? ही आश्चर्याची बाब आहे बालमृत्यूची आकडेवारी सरकारने स्वतः विधानसभेत मांडली. त्यामुळे सरकारला माझा सल्ला आहे की, आपण शहरांचा विकास झपाट्याने करीत आहात याचे स्वागतच.परंतु आदिवासी भाग,अती दुर्गम भागात आपण प्रवेश करावा आणि तेथील जनतेच्या समस्यांची चौकशी करावी व आरोग्य सुविधा,अन्न,वस्त्र आणि निवारा याबद्दलची कठोर पाऊले उचलुन तेथे सरकारने ताबडतोब आरोग्य सुविधांसह इतरही संपूर्ण सुविधा प्रदान कराव्यात. कारण नामांकित जिल्ह्यांमध्ये हजारोंच्या संख्येने बालमृत्यू म्हणजे सरकार मार्फत या भागात दुर्लक्ष करून झालेली हत्याच म्हणावी लागेल.त्यामुळे या संपूर्ण बाबींचे गांभीर्य लक्षात घेऊन सरकारने या सातही जिल्ह्यामध्ये जावून तेथील चौकशी करावी व तेथील नागरिकांसाठी ताबडतोब आरोग्याच्या दृष्टिकोनातून लागणाऱ्या संपूर्ण सुविधा उपलब्ध करून द्याव्यात?जय हिंद.

**लेखक**
**रमेश कृष्णराव लांजेवार**
**( स्वतंत्र पत्रकार )**
**मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.**

# निवडणूक विषयक कामकाजाचा विविध प्राधिकरणांच्या बैठकीतून आढावा

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.१८, नवी मुंबई :** राज्य निवडणूक आयोगामार्फत नवी मुंबई महानगरपालिकेची सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६, दि.१५ जानेवारी २०२६ रोजी जाहीर करण्यात आलेली असून त्या अनुषंगाने महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी निवडणुकीशी संबधित महानगरपालिकेचे अधिकारी तसेच पोलीस व इतर सर्व प्राधिकरणांचे अधिकारी आणि निवडणूक आयोगामार्फत नियुक्त उपजिल्हाधिकारी संवर्गातील निवडणूक निर्णय अधिकारी व तहसिलदार, नायब तहसिलदार संवर्गातील सहा. निवडणूक अधिकारी यांची विशेष बैठक घेत निवडणूक कामकाज निष्पक्ष व पारदर्शकपणे पार पाडण्यासाठी सर्वांनी परस्पर समन्वयाने सामुहिक भावनेने काम करावे असे निर्देश दिले. याप्रसंगी अतिरिक्त आयुक्त सुनिल पवार व डॉ. राहुल गेठे, सह.पोलीस आयुक्त संजय येनपुरे, नमुंमपा निवडणूक विभागाचे उपआयुक्त भागवत डोईफोडे तसेच इतर प्राधिकरणांचे अधिकारी उपस्थित होते.

**राजकीय पक्ष प्रतिनिधींच्या विशेष बैठकीतून निवडणूक विषयक व आचारसंहिता नियमांबाबत माहिती प्रसारण.**

नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील विविध राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींची विशेष बैठक घेऊन आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांनी निवडणूक विषयक संपूर्ण माहिती देत आचार




संहितेच्या नियमांचे काटेकोर पालन करुन निवडणूक प्रक्रिया सुव्यवस्थित रितीने पार पाडण्याचे आवाहन केले. यावेळी त्यांनी राजकीय पक्षाच्या प्रतिनिधींनी विचारलेल्या विविध प्रश्नांना सुयोग्य उत्तरे देऊन शंका समाधान केले. यावेळी प्रथमतःच एका प्रभागात चार सदस्य अशाप्रकारे बहुसदस्यीय पद्धतीने निवडणूक होत असल्याने एका मतदाराला आपल्या प्रभागातील अ,ब,क,ड अशा चार उमेदवारांना मतदान करावयाचे आहे याबाबत व्यापक जनजागृती करण्यात येणार असल्याचे आयुक्तांनी सांगितले. याकरिता आपल्यामार्फतही नागरिकांमध्ये जनजागृती करावी असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

**पत्रकार परिषदेतून माध्यम प्रतिनिधींशी निवडणूक विषयक सुसंवाद – सहकार्याचे आवाहन**

विविध प्रसार माध्यमांच्या प्रतिनिधींशी नमुंमपा निवडणूकीविषयी सुसंवाद साधतांना आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी निवडणूक कार्यक्रमाची संपूर्ण माहिती दिली. नवी मुंबई महानगरपालिकेची निवडणूक गुरुवार दि. १५ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ७.३० ते सायं.५.३० यावेळेत होणार असून मतमोजणी शुक्रवार दि. १६ जानेवारी २०२६ रोजी सकाळी १० पासून होणार असल्याची माहिती आयुक्तांनी दिली. याकरिता ०१ जुलै २०२५ रोजीची मतदार यादी ग्राह्य धरण्यात आली असल्याची सांगत दि. २३ डिसेंबर २०२५ ते २९ डिसेंबर २०२५ या कालावधीत सकाळी ११ ते दुपारी ३ तसेच ३० डिसेंबर २०२५ रोजी सकाळी ११ ते दुपारी २ या वेळेत नामनिर्देशन पत्र दाखल करता येतील असे त्यांनी सांगितले. दि. २५ डिसेंबर व २८ डिसेंबर रोजी नामनिर्देशन पत्रे देण्यात व स्विकारण्यात येणार नाहीत असे त्यांनी नमूद केले.

दि.३१ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी ११ वा. पासून नाम निर्देशन पत्रांची छाननी करण्यात येणार असून त्यानंतर लगेचच वैधरित्या नामनिर्देशित उमेदवारांची यादी प्रसिद्ध केली जाणार आहे. दि. ०२ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ११ ते दुपारी ०३ या वेळेपर्यंत उमेदवारी अर्ज मागे घेता येणार असून दि. ०३ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ११ नंतर निवडणूक चिन्ह नेमून दिले जाणार आहे. दि. ०३ जानेवारी रोजीच अंतिमरित्या निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची यादी प्रसिद्ध केली जाणार आहे व १५ जानेवारी रोजी निवडणूक होणार आहे असे त्यांनी सांगितले.

# आंतरराज्य अमली पदार्थ तस्करी टोळीवर ठाणे पोलिसांची मोक्का कारवाई

## १४ आरोपींविरुद्ध गुन्हा, ३५ किलो गांजा व शस्त्रसाठा जप्त

**अक्षराज : भानुदास गायकवाड**

**दि.१८, कल्याण :** आंतरराज्य पातळीवर अमली पदार्थांची तस्करी करणाऱ्या टोळीविरोधात ठाणे पोलीस आयुक्तालयाने महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम (मोक्का) अंतर्गत मोठी कारवाई केली आहे.

या प्रकरणात एकूण १४ आरोपींविरुद्ध मोक्का लावण्यात आला असून ३५ किलो ४०० ग्रॅम गांजा, गावठी पिस्तूल, जिवंत काडतुसे व कार असा सुमारे १६.३५ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. २८ ऑगस्ट २०२५ रोजी गुप्त बातमीदारामार्फत निळ्या रंगाच्या सुझुकी बलेनो कारमधून कल्याण रेल्वे स्थानक परिसरात गांजाची विक्री होणार असल्याची खात्रीशीर माहिती मिळाली. त्यानुसार महात्मा फुले चौक पोलीस ठाणे व कल्याण शहर वाहतूक शाखेच्या संयुक्त पथकाने सायंकाळी सापळा रचला.




संशयित कार थांबवण्याचा प्रयत्न केला असता आरोपींनी पोलीस कर्मचाऱ्याच्या अंगावर गाडी घालून पळून जाण्याचा प्रयत्न केला. मात्र पाठलाग करून पोलिसांनी कारसह एका आरोपीला ताब्यात घेतले. कारची झडती घेतली असता ३५ किलो ४०० ग्रॅम गांजा, एक गावठी पिस्तूल व दोन जिवंत राऊंड सापडले. याप्रकरणी महात्मा फुले चौक पोलीस ठाण्यात एनडीपीएस, आर्म्स ॲक्ट, भारतीय न्याय संहिता तसेच महाराष्ट्र पोलीस अधिनियमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला. तपासा दरम्यान नागपूर, भिवंडी व ओडिशा येथील आणखी आरोपी निष्पन्न झाले. आरोपींविरुद्ध यापूर्वी एनडीपीएस अंतर्गत ४० पेक्षा अधिक गुन्हे दाखल असल्याचे ही उघड झाले आहे. ही टोळी ओडिशातून मोठ्या प्रमाणात गांजाची खरेदी करून महाराष्ट्रातील नागपूर, ठाणे, मुंबई व नाशिक शहरांत विक्री करत असल्याचे तपासात स्पष्ट झाले आहे. या संघटित गुन्हेगारी पार्श्वभूमीवर मा. अपर पोलीस आयुक्त (पूर्व प्रादेशिक विभाग, कल्याण) यांच्या परवानगीने आरोपींविरुद्ध मोक्का कायद्यांतर्गत कारवाई करण्यात आली आहे.

अटक आरोपींना मध्यवर्ती कारागृह, कल्याण येथून ताब्यात घेऊन मोक्का विशेष न्यायालयात हजर करण्यात आले असून २३ डिसेंबर २०२५ पर्यंत पोलीस कोठडी मंजूर करण्यात आली आहे. ही कारवाई अपर पोलीस आयुक्त संजय जाधव, पोलीस उप आयुक्त अतुल झेंडे व सहाय्यक पोलीस आयुक्त डॉ.कल्याण घेटे यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक बलिरामसिंग परदेशी व त्यांच्या पथकाने केली. पुढील तपास सहाय्यक पोलीस आयुक्त डॉ.कल्याण घेटे करीत आहेत.

# वेळा अमावस्येनिमित्त मंद्रुपमध्ये भाजी खरेदीसाठी गर्दी

**अक्षराज : शिवराज मुगळे**

**दि.१८, सोलापूर :** शेतकऱ्यांची धरणीमातेप्रती असलेले ऋण व्यक्त करण्यासाठी वेळ अमावस्या सण साजरा केला जातो. या दिवशी धरणीमातेची पूजा करून सर्व भाज्यांचे मिश्रण असलेली 'भज्जी' नैवेद्य म्हणून दाखवण्यात येतो. शिवाय शेजारी, मित्र परिवार, शहरातील प्रमुख-पाहुणे व नातेवाईक यांच्यासाठी बाजरीची उंडे व भाजी विशेष महत्त्व आहे. या भज्जीसाठी लागणारी भाजी खरेदी करण्यासाठी मंद्रुपच्या बाजारात भाजीपाला विकणाऱ्यांची व खरेदी करणाऱ्यांची मोठी गर्दी होती.शुक्रवारी मंद्रुपसह परिसरात वेळा अमावस्या साजरी करण्यात येणार आहे. वेळ अमावस्येला चुका, पालक, कोथिंबीर, भेंडी, दोडका, टोमॅटो, मेथी, मिरची, काकडी, कांदा यासह अनेक कडधान्य टाकून खज्जी भज्जी तयार करण्यात येतो. या खजी भाजीसाठी लागणाऱ्या भाजी खरेदी करण्यासाठी गुरूवारी दुपारपासूनच मंद्रुप बाजारामध्ये भाजी विकणाऱ्या शेतकऱ्यांची व खरेदी करणाऱ्या महिला वर्गांची मोठ्या प्रमाणात गर्दी दिसून आली.धरणीमातेच्या पूजेसाठी मातीची भांडी देखील वापरली जाते. मातीची भांडी विकणारे कुंभारही बाजारात होते. शिवाय गावातील सर्व देवतांना या दिवशी नैवेद्य दाखविण्यात येत असल्यामुळे या नैवेद्यासाठी नारळ मोठ्या प्रमाणात वापरण्यात येतो. नारळ खरेदी करण्यासाठी किराणा बाजारासह शिव- बसव चौकातील राम कुंभार यांच्या दुकानाजवळ मोठ्या प्रमाणात गर्दी होती. वेळा अमावस्या सण शेतकऱ्यांसाठी आनंदाचा सण असल्याने शेतकरी मोठ्या उत्साहाने भाजीपाला खरेदी करताना दिसून येत होते. या वर्षी मंद्रुप परिसरात चांगला पाऊस झाल्याने भाजीपाल्यांचे दर कमी होते.



**शेतकऱ्यांमध्ये मोठा उत्साह; खज्जी, भज्जी व उंडेंना मोठा मान**

मंद्रुपसह परिसरातील शेतकरी मोठ्या उत्साहाने वेळ अमावस्या सण साजरा करीत असतो. या दिवशी मित्र व नातेवाईक यांना खज्जी भज्जी व बाजरीची उंडे भोजनासाठी देण्यात येते. सर्व भाजींचे मिश्रण असलेल्या खजी भज्जी तयार करण्यासाठी लागणारे भाजीपाला खरेदी करण्यासाठी मंद्रुपमध्ये शेतकरी मोठी गर्दी करतात. मंद्रुपसह परिसरातील शेतकरी व ग्राहक मोठ्या प्रमाणात मंद्रुपला येतात.

**- शिवपुत्र जोडमोठे, ग्रामपंचायत सदस्य, मंद्रुप**

# नयानगरमध्ये मुस्लिम बांधवांकडून गोमांस विक्रीला पूर्णविराम

## मंत्री सरनाईक यांनी 'गोमातेची प्रतिकृती देत केला मुस्लिम बांधवांचा सन्मान

**अक्षराज : घनश्याम आंबोकर**

**दि.१८, मिरा-भाईंदर :** मिरा-भाईंदरशहराच्या सामाजिक सलोख्याच्या इतिहासात आज एक सुवर्णपान जोडले गेले आहे. 'गोमाता' ही राज्यमाता असताना, तिच्या सन्मानाचे रक्षण करण्यासाठी नयानगर (मिरा रोड) येथील मुस्लिम बांधवांनी (कुरेशी समाज) एकमुखी निर्णय घेत परिसरात गोमांस विक्रीवर पूर्णपणे बंदी घातली आहे.



मुस्लिम समुदायाने घेतलेल्या या स्तुत्य आणि धाडसी निर्णयाचे स्वागत करण्यासाठी दिनांक १८ डिसेंबर २०२५ रोजी महाराष्ट्र राज्य परिवहन मंत्री तथा धाराशिव जिल्हा पालकमंत्री प्रताप सरनाईक यांनी नयानगर गाठून या निर्णयाचे तोंडभरून कौतुक केले. नयानगर परिसरात मोठ्या संख्येने मुस्लिम समाज वास्तव्यास आहे. काही समाजकंटकांकडून गोमांस तस्करीच्या घटना घडवून या परिसराची प्रतिमा मलीन करण्याचा प्रयत्न सातत्याने होत होता.

याला चोख प्रत्युत्तर देण्यासाठी परिसरातील वरिष्ठ मुस्लिम बांधवांनी (कुरेशी समाज) एकत्रित बैठक घेतली. या बैठकीत नयानगर परिसरात कोणत्याही प्रकारे गोमांस विक्री होऊ देणार नाही असा ऐतिहासिक ठराव मंजूर करण्यात आला. विशेष म्हणजे, जर कोणी हा नियम मोडला तर त्याच्यावर केवळ कायदेशीर कारवाईच नाही, तर मुस्लिम बांधव स्वतः पुढाकार घेऊन अशा प्रवृत्तींना आळा घालतील, असा कडक इशाराही समुदायाने दिला आहे.

या कौतुकास्पद निर्णयाची दखल घेत मंत्री प्रताप सरनाईक यांनी आज हैदरी चौक, नयानगर येथे भेट दिली. यावेळी त्यांनी मुस्लिम समाजाच्या या निर्णयाचे अभिनंदन करत त्यांना 'गोमातेची प्रतिकृती' भेट स्वरूप देत त्यांचा गौरव केला. मुस्लिम समुदायाने घेतलेल्या या निर्णयामुळे संपूर्ण मिरा-भाईंदर शहरात आनंदाचे वातावरण आहे. जाणीवपूर्वक केल्या जाणाऱ्या बदनामीला बगल देत, सामाजिक शांतता आणि धार्मिक पावित्र्य जपण्यासाठी मुस्लिम बांधवांनी जो आदर्श घालून दिला आहे, त्याचे सर्व स्तरांतून स्वागत होत आहे.यावेळी बोलताना मंत्री प्रताप सरनाईक म्हणाले की, मिरा-भाईंदर हे शहर 'सर्वधर्म समभावाचे' उत्तम उदाहरण आहे.

नयानगरमधील मुस्लिम बांधवांनी घेतलेला हा निर्णय केवळ धार्मिक सलोखा वाढवणारा नसून, तो देशाच्या कायद्याचा सन्मान करणारा आहे. या निर्णयामुळे मिरा-भाईंदरमधील एकोपा अधिक घट्ट झाला आहे. जे लोक कायद्याचे पालन करणार नाहीत, त्यांच्यावर शासन स्तरावर कठोर कारवाई केली जाईल, मात्र समाजाने स्वतःहून घेतलेला हा पुढाकार खरोखरच कौतुकास्पद आहे.

# शेतीला आधुनिक तंत्रज्ञानाची गरज - सहकार मंत्री बाबासाहेब पाटील

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१८, माळेगाव (नांदेड) :** शेतीला आधुनिक तंत्रज्ञानाची गरज असल्याचे प्रतिपादन राज्याचे सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी माळेगाव येथे केले. ते माळेगाव येथे खंडोबा यात्रेनिमित्त नांदेड जिल्हा परिषद यांच्या वतीने आयोजित कृषी प्रदर्शनाच्या उद्घाटनापाप्रसंगी बोलत होते.



यावेळी व्यासपीठावर आ. प्रताप पाटील चिखलीकर, जिल्हा परिषदेचे अतिरिक्त उपमुख्य कार्यकारी अधिकारी सदिप माळोदे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी राजकुमार मुक्कावार, माजी जि. प.सभापती प्रविण पाटील चिखलीकर, माजी जि.प. सदस्या सौ. प्रणितताताई देवरे चिखलीकर, शरद पवार, सुनिल नानवटे, पशुसवर्धन अधिकारी प्रविणकुमार घुले, रोहित पाटील, चद्रमुनी मस्के, माळेगावच्या सरपंच कमलबाई रुस्तुमराव धुळगंडे सह विविध मान्यवर उपस्थित होते. यावेळी पुढे बोलताना ना.पाटील म्हणाले की, माळेगाव यात्रेला विशेष महत्व असून, या यात्रेचे वेगळे वैशिष्ट्य आहे. आपला देश कृषी प्रधान असून, शेतीमुळे अर्थ व्यवस्था बळकट होती. शेतीत ए आय तंत्रज्ञानाचा वापर करावा. शेतकऱ्यांनी दुग्धव्यवसाय कडे वळावे असे आवाहनही सहकार मंत्री ना. पाटील यांनी केले.

# थोडक्यात

## सावरमाळ प्राथमिक आरोग्य केंद्रा तर्फे शालेय विद्यार्थ्यांची सिकलसेल तपासणी

**अक्षराज : अशोक लोणीकर**



**दि.१८, मुखेड (नांदेड) :** मुखेड तालुक्यातील सावरमाळ येथील प्राथमिक आरोग्य केंद्रांतर्गत येणाऱ्या जिल्हा परिषद प्राथमिक शाळा आणि श्री. छत्रपती शिवाजी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय सावरमाळ येथे सिकलसेल जनजागृती सप्ताहानिमित्त विशेष तपासणी शिबिर उत्साहात पार पडले. या मोहिमेत एकूण १६५ विद्यार्थ्यांची सिकलसेल चाचणी करण्यात आली.

जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.संगीता देशमुख आणि तालुका आरोग्य अधिकारी डॉ.आकाश देशमुख यांच्या विशेष मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबवण्यात आला. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये सिकलसेल या अनुवांशिक आजाराबद्दल जागरूकता निर्माण करणे आणि बाधितांचा शोध घेऊन त्यांना वेळेवर उपचार उपलब्ध करून देणे, हा या शिबिराचा मुख्य उद्देश होता. या शिबिरात जिल्हा परिषद शाळा, सावरमाळ येथील ८६ लाभार्थी आणि श्री.छत्रपती शिवाजी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील ७९ लाभार्थी अशा एकूण १६५ विद्यार्थ्यांची रक्ततपासणी करण्यात आली. याप्रसंगी सावरमाळ आरोग्य केंद्राचे प्रभारी वैद्यकीय अधिकारी डॉ.शेखरकुमार सोनटक्के व वैद्यकीय अधिकारी डॉ.सिद्धेश्वर धनमने यांनी सिकलसेल आजाराची लक्षणे आणि घ्यावयाची काळजी यावर मार्गदर्शन केले. सुषमा ढगे, परिचारिका यांनी विद्यार्थ्यांच्या प्राथमिक तपासणीत सहकार्य केले. तपासणीची तांत्रिक जबाबदारी प्रयोगशाळा वैज्ञानिक अधिकारी अफरोज शेख आणि HLL प्रयोगशाळा तंत्रज्ञ ओंकार इंदोरे यांनी यशस्वीरित्या पार पाडली. आरोग्य सहाय्यक नामदेव उंदरे यांनी विद्यार्थ्यांची नोंदणी व मार्गदर्शन केले. तसेच या मोहिमेच्या नियोजनासाठी रुग्णवाहिका चालक रामराव कुडदुले यांनी विशेष परिश्रम घेतले. शालेय स्तरावर राबवण्यात आलेल्या या आरोग्य तपासणी मोहिमेचे शिक्षक, पालक आणि ग्रामस्थांकडून कौतुक होत आहे.

## सरकार विरुद्ध तीव्र आंदोलन करणार - डॉ.विजय शिंदे

**अक्षराज : बाळू धायगुडे**



**दि.१८, खंडाळा (सातारा) :** खंडाळा तालुका विकास प्रतिष्ठान व पाणी संघर्ष समिती यांच्या संयुक्त विद्यमाने खंडाळा तहसीलदार यांना नुकतेच निवेदन देण्यात आले. यावेळी खंडाळा तालुक्यातील वंचित गावांना निरा देवधर प्रकल्पाचे अतिरिक्त पाण्यातील आवश्यक शेती पाणी देण्यात यावे यासाठी आग्रही मागणी करण्यात आली. सद्यस्थितीत बंदीस्त पाईपलाईनद्वारे उर्वरित कामे करण्यात येणार असल्याने तसेच औद्योगिकरणामुळे व नागरिकीकरणामुळे सुमारे ४ टीएमसी अतिरिक्त होत आहे. तरी यापैकी खंडाळा तालुक्यातील वंचित गावांचे सर्वेक्षण करून आवश्यक पाणी खंडाळा तालुक्यातील शेतकऱ्यांना देण्यात यावे. असे खंडाळा तालुका विकास प्रतिष्ठानचे निवेदन देण्यात आले. गेली ३३ वर्षाहून आधिक काळ प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष रामचंद्र चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली प्रतिष्ठान संघर्ष करत आले आहे. यापुर्वी पाणी उपलब्ध नाही अशी सबब शासनाकडून दिली जात होती. परंतु शासनाकडे सध्या आवश्यक पाणी उपलब्ध आहे व हीच योग्य वेळ आहे तरी तत्काळ याची दखल घेत पाणी द्यावे अशी मागणी प्रतिष्ठानचे अध्यक्ष सुनील पवार व सचिव डॉ.विजय शिंदे यांनी केली अन्यथा तीव्र आंदोलन केले जाईल असा इशाराही दिला. यावेळी नामदेव बरकडे, प्रा.एन.बी चव्हाण, चंद्रकांत ढमाळ,धनाजी डेरे,अशोक पवार व वंचित गावांमधील महिला व पुरुष शेतकरी बहुसंख्येने उपस्थित होते.

## शंकरराव चव्हाण विद्यालयाच्या मुलींनी रस्सीखेच स्पर्धेत रौप्य पदक पटकावले



**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.२८, नागपूर :** प्रबळ इच्छाशक्ती आणि कठोर परिश्रम असले की यशाचे शिखर गाठणे कठीण नसते, हे खापरखेडा येथील शंकरराव चव्हाण विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयाच्या १९ वर्षांखालील मुलींच्या रस्सीखेच संघाने सिद्ध करून दाखवले. दिनांक १७ डिसेंबर २०२५ रोजी नांदेड येथे पार पडलेल्या राज्यस्तरीय रस्सीखेच स्पर्धेत शंकरराव चव्हाण विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयाच्या संघाने आपल्या ताकदीच्या आणि एकजुटीच्या जोरावर रौप्य पदक पटकावले. विद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. दैदीप्यमान यशानंतर राज्यस्तरीय रस्सीखेच संघातील यशस्वी खेळाडू, मार्गदर्शक सहाय्यक शिक्षिका पुष्पा बढिये, मनिषा नखाते, प्रशिक्षक पियुष भोकरे यांनी विद्यालयाचे प्रेरणास्थान राज्याचे माजी मुख्यमंत्री व राज्यसभा सदस्य अशोकराव चव्हाण आणि आमदार श्रीजयाताई चव्हाण यांची नांदेड येथे सदिच्छा भेट घेतली. यावेळी अशोकराव चव्हाण व आमदार श्रीजया चव्हाण यांनी खेळाडूंशी संवाद साधताना त्यांच्या खेळातील बारकावे आणि संघर्षाची माहिती जाणून घेतली. विशेष म्हणजे केवळ अभिनंदन करून न थांबता त्यांनी अत्यंत आपुलकीने शाळेच्या प्रगतीबद्दल आणि खेळाडूंना मिळणाऱ्या सोयी सुविधांबद्दलही चौकशी केली. एका ज्येष्ठ लोकनेत्याने दाखवलेली ही आत्मीयता खेळाडूंचा उत्साह द्विगुणित करणारी ठरली.

## मलेगाव येथे महालक्ष्मी महोत्सव भक्तिमय वातावरणात संपन्न

**अक्षराज : रविंद्र खाडे**

**दि.१८, शहापूर, (ठाणे) :** शहापूर तालुक्यातील माळेगाव येथे आज परंपरेनुसार महालक्ष्मी महोत्सव उत्साहात साजरा करण्यात आला. या महोत्सवाच्या निमित्ताने संपूर्ण गावात भक्तीमय वातावरण पसरले होते. महालक्ष्मी मातेची पालखी मोठ्या भक्तिभावाने काढण्यात आली. या पालखी सोहळ्यात पंचक्रोशीतील हजारो भाविक सहभागी झाले होते. महालक्ष्मी मातेच्या दर्शनासाठी भाविकांनी मोठी गर्दी केली होती. महोत्सवाच्या निमित्ताने हळदीकुंकू समारंभ, मंगलागौर, पालखी सोहळा, महाप्रसाद तसेच भजनाची डबलबारी यांचे आयोजन करण्यात आले होते. भजनाच्या डबलबारीमुळे परिसर भक्तिरसात न्हाल्याचे दिसून आले. मलेगाव येथे हा महालक्ष्मी महोत्सव सालाबादप्रमाणे श्रद्धा व भक्तीभावाने साजरा केला जातो. ग्रामस्थांच्या सहकार्याने हा उत्सव शांततेत आणि उत्साहात पार पडला.